**ग्रंथालय संचालनालय व अधिनस्त कार्यालयांसाठी संगणक, मल्टीफंक्शन प्रिंटर, हॅन्ड स्कॅनर व बारकोड स्कॅनर इत्यादी साहित्याची खरेदी करण्यास निधी वितरीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन ज्ञापन क्रमांक मराग्रं-२०२४/प्र.क्र.१३८/ई-८४०६२२ /ग्रं.क.**
मादाम कामा मार्ग, हुतात्म राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक : १८ मे, २०२६.

**वाचा :** १) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२५/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.०९.०४.२०२६,
२) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं-२०२४/प्र.क्र.१३८/ ई- ८४०६२२/ग्रं.क., दि.२३.०९.२०२५
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मराग्रं-२०२४/प्र.क्र.१३८/ ई-८४०६२२/ग्रं.क., दि.२७.०९.२०२५
४) ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांचे पत्र जा.क्र.३४/रावाख- निधी/२०२६-२७/ १५७, दि.०८.०४.२०२६.

**ज्ञापन :**

वित्तीय वर्ष सन २०२५-२६ मध्ये अर्थसंकल्पित निधीच्या मर्यादेत राज्य स्तरीय योजना लेखाशीर्ष “ग्रंथालय संचालनालय आणि ६ सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांचे संगणकीकरण (२२०५३०५४)” अंतर्गत मुख्यालय व अधिनस्त कार्यालयांसाठी रु.१,८८,४६,६९०/- इतक्या निधीच्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ येथील दि.२३.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने, संदर्भाधीन क्र. ३ येथील शासन ज्ञापन दि.२७.०९.२०२५ अन्वये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये २२०५३०५४ या लेखाशीर्षांतर्गत रु.१३३.९५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.

२. शासन निर्णय दि.२३.०९.२०२५ मधील अटी व शर्तींच्या अधीन राहून संगणकीय सामग्री खरेदी करण्याच्या अनुषंगाने देण्यात आलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेत २२०५३०५४ या लेखाशीर्षांतर्गत प्रलंबित देयके अदा करण्यासाठी उर्वरित निधी वितरीत करण्याचा संदर्भाधीन क्र. ४ येथील पत्राव्दारे ग्रंथालय संचालनालयाने प्रस्ताव सादर केला आहे. त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील दि.०९.०४.२०२६ रोजीच्या परिपत्रकानुसार २२०५३०५४ या लेखाशीर्षांतर्गत १७ - संगणक खर्च व २१ - सामग्री व पुरवठा या उद्दीष्टशीर्षांमधून अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ६०% निधी वितरणाची निश्चित करण्यात आलेली मर्यादा विचारात घेता वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सदर खरेदीसंदर्भातील प्रलंबित देयके अदा करण्यासाठी रु.५४,८७,९००/- इतका निधी वितरीत करण्यास

शासन मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

रुपये लाखात

| लेखाशीर्ष | उद्दीष्टशीर्ष | आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये अर्थसंकल्पीत तरतूद | प्रत्यक्षात वितरीत निधी |
|---|---|---|---|
| ग्रंथालय संचालनालय आणि ६ सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांचे संगणकीकरण (२२०५३०५४) | १७-संगणक खर्च, | १००.०० | ४०.९१ |
| | २१-पुरवठा सामग्री, | ४००.०० | १३.९६ |
| एकूण | | | ५४.८७ |

३. ग्रंथालय संचालनालयाने सन २०२५-२६ या वर्षातील वितरीत निधीबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र तसेच आता वितरीत होणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र सदर साहित्याच्या कार्यालयनिहाय तपशिलासह पुढील निधी वितरणापूर्वी सादर करावे.

४. प्रस्तुत प्रकरणी संदर्भीय शासन निर्णय दि.२३.०९.२०२५ मध्ये नमूद अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याची खातरजमा करण्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रंथालय संचालक यांची राहील. पुढील निधी वितरणावेळी विहीत नमुन्यातील प्रपत्र अ नुसार तक्त्याच्या स्वरुपात निधी वितरण करण्याचा प्रस्ताव सादर करण्याची दक्षता ग्रंथालय संचालकांनी घ्यावी.

५. सदर ज्ञापन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : विअप्र- २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ अनुसार वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ मधील भाग पहिला, उपविभाग एक, अनुक्रमांक ६, नियम क्र.४० अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर खर्च "मागणी क्र. डब्लू-४, २२०५, कला व संस्कृती, १०५, सार्वजनिक ग्रंथालये (०१), ग्रंथालय संचालनालय (०३) (०८) ग्रंथालय संचालनालय आणि ६ सहाय्यक ग्रंथालय संचालक कार्यालयांचे संगणकीकरण लेखाशीर्ष (२२०५ ३०५४) १७-संगणक खर्च, २१-पुरवठा सामग्री" या उद्दीष्टशीर्षामध्ये सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये अर्थसंकल्पीत निधीमधून करण्यात यावी.

७. सदर शासन ज्ञापन वित्त विभाग अनौ.सं.क्र.३४४/व्यय-५, दि.२७.०४.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१८१६४४२४१७०८ असा आहे. सदर आदेश आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D753981F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.05.18 16:45:43 +05'30'

(अ. ता. कुंडले)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति :-**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
६. महालेखापाल -१ (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई.
९. अवर सचिव, अर्थसंकल्प, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. निवडनस्ती, ग्रंथालय कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.